**उमेदवाराच्या प्रवेश वाटपासंदर्भात उमेदवाराने व ज्या महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झालेले आहे अशा महाविद्यालयाने Reporting च्या कालावधीत करावयाच्या प्रक्रियेबाबत ठळक टप्पे**

---

**उमेदवारास प्रवेशाचे वाटप 'फ्लोट' किंवा 'फ्रीझ' करावयाचे असल्यास**

उमेदवारास त्याच्या लॉग-इन मध्ये तात्पुरते प्रवेश वाटप पत्र (Provisional Allotment Letter) उपलब्ध असेल. उमेदवाराने या प्रवेश वाटप पत्राची प्रिंट आऊट घ्यावी.

↓

उमेदवाराने प्रवेश वाटप पत्रावरील Undertaking येथे स्वतःची स्वाक्षरी करावी.

↓

प्रवेश अर्ज भरतांना जी कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड केलेली आहेत, अशी सर्व मूळ कागदपत्रे आणि प्रवेश वाटप पत्र उमेदवाराने सोबत घ्यावे आणि ज्या महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झालेले आहे, त्या महाविद्यालयात वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या Reporting च्या कालावधीत उपस्थित रहावे. तसेच ज्या धर्तीवर प्रवेशाचे वाटप झालेले नाही, अशी उमेदवाराने अपलोड केलेली कागदपत्रेसुध्दा महाविद्यालयाने तपासावीत व ते योग्य असल्याची खात्री करावी.

↓

ज्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले आहे, ती कागदपत्रे प्रथमतः महाविद्यालयाने तपासावीत. ही कागदपत्रे योग्य असल्यास, महाविद्यालयाने महाविद्यालयाच्या लॉग इनमध्ये submit हया बटनावर क्लिक करावे.

**किंवा**

ज्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले आहे, त्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास प्रवेशाचे वाटप रद्द करावे, त्यासाठी महाविद्यालयाने, महाविद्यालयाच्या लॉग-इनमध्ये उमेदवाराच्या नावा समोरील Remark रकान्यात त्रुटीची नोंद करावी व Submit या बटनावर क्लिक करावे.

**याचबरोबर**

ज्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवारास प्रवेशाचे वाटप झाले नाही अशा कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास प्रवेशाचे वाटप रद्द करू नये. मात्र त्यासाठी महाविद्यालयाने, महाविद्यालयाच्या

लॉग-इनमध्ये उमेदवाराच्या नावा समोरील Not correct / Not Submit / Not Visible बटनावर क्लिक करुन रकान्यात त्रुटीची नोंद करुन save करावे.

↓

महाविद्यालयाने सर्व मूळ कागदपत्रे उमेदवारास परत करावीत आणि उमेदवाराने अशा सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती (Xerox) महाविद्यालयाकडे जमा कराव्यात. महाविद्यालयाने त्यांच्या लॉग-इनमध्ये Approved या बटनावर क्लिक केल्यानंतर उमेदवाराच्या लॉग-इनमध्ये फ्लोट किंवा फ्रीझ हे बटन उपलब्ध (**Active**) होईल.

↓

उमेदवारास प्रवेश अंतिम करावयाचा असल्यास त्याने 'फ्रीझ' बटन क्लिक करावे. हे बटन क्लिक केल्यानंतर 'जागा स्वीकृती शुल्क' रू.१०००/- भरण्यासाठीचा पेमेंट गेटवे उमेदवारास उपलब्ध होईल. क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड किंवा नेट बँकींगद्वारे या गेटवेमार्फत सदरची रक्कम उमेदवाराने जमा करावी. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उमेदवारास Freeze and Approved असा संदेश स्क्रीनवर दिसेल व प्रवेशाचे वाटप फ्रीझ होईल.

↓

उमेदवारास वरील पसंतीक्रमातील महाविद्यालयात प्रवेशासाठी अजून एक संधी घ्यावयाची असल्यास 'फ्लोट' विकल्प स्वीकारावा व वरील प्रमाणेच रू.१०००/- जागा स्वीकृती शुल्क जमा करण्याची प्रक्रिया करावी. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उमेदवारास FLOAT AND APPROVED असा संदेश स्क्रीनवर दिसेल, त्यानंतरच प्रवेशाचे वाटप फ्लोट होईल.

**'फ्लोट' पर्याय फक्त पहिल्या ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीपुरताच मर्यादित आहे.**

↓

**उमेदवारास प्रवेशाचे वाटप नाकारायचे (Refuse) असल्यास**

ज्या उमेदवारांना प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशा सर्व उमेदवारांच्या लॉग-इनमध्ये Refuse Admission बटन उपलब्ध आहे. उमेदवाराने Refuse Admission या बटनावर क्लिक करावे. यासाठी उमेदवारास कोणत्याही महाविद्यालयात उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही. हे बटन क्लिक केल्यानंतर उमेदवारास ज्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला आहे, त्या महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेश फेरीद्वारे पुन्हा प्रवेश मिळणार नाही. परंतु इतर पसंतीक्रमाच्या महाविद्यालयात प्रवेश मिळू शकतो. त्यामुळे बटन क्लिक करतांना उमेदवाराने विचारपूर्वक निर्णय घ्यावा.

**उमेदवाराच्या प्रवेश वाटपासंदर्भात उमेदवाराने व ज्या महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झालेले आहे अशा महाविद्यालयाने Reporting च्या कालावधीत करावयाच्या प्रक्रियेबाबत**

---

**<u>विशेष सूचनाः-</u>**

१. उमेदवाराने वरील Freeze / Float / Refuse याप्रमाणे प्रक्रिया करणे अनिवार्य आहे. असे न केल्यास उमेदवारास प्रवेश प्रक्रियेमध्ये स्वारस्य नाही, असे समजून पुढील ऑनलाईन प्रवेश फेऱ्यांमध्ये अशा उमेदवारांना समाविष्ट करण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२. ज्या उमेदवारांना महाविद्यालय पसंतीक्रमातील पहिल्या विकल्पावर प्रवेशाचे वाटप झालेले आहे, त्यांनी **'फ्रीझ'** नुसार प्रक्रिया करणे अनिवार्य आहे. त्या उमेदवारांना प्रवेश नाकारण्याची सुविधा उपलब्ध नाही. अशा उमेदवारांना पुढील ऑनलाईन प्रवेश फेरीच्या प्रक्रियेमध्ये सुध्दा समाविष्ट करण्यात येणार नाही.

**संचालक (शिक्षण)**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे**